


दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शनिवार | 14 फेब्रुवारी 2026 | अंक क्र. 267 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4







Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# प्रभू वैद्यनाथाच्या नगरीत राष्ट्रीय स्तरावरील महापशुधन एक्सपोचे उद्घाटन संपन्न आज देवेंद्र फडणवीस राहणार उपस्थित


## "नोकरी करणारे नव्हे, नोकरी देणारे व्हा" : तरुणांना पंकजा मुंडेंचे आवाहन



■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

महाशिवरात्रीच्या पावन औचित्यावर प्रभू वैद्यनाथाच्या नगरीत आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय स्तरावरील 'महापशुधन एक्सपो'चे उदघाटन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री Pankaja Munde यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. या प्रसंगी बोलताना त्यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री Ajit Pawar यांची भावनिक आठवण काढत श्रद्धांजली वाहिली. "परळीत भरवण्यात आलेल्या या महापशुधन एक्सपोची संकल्पना अजितदादांना निश्चितच आवडली असती. त्यांनी आमचे कौतुक केले असते आणि काही मोलाच्या सूचनाही दिल्या असत्या," असे सांगताना पंकजा मुंडे भावुक झाल्या. यापूर्वी अशाच प्रदर्शनात वडील दिवंगत Gopinath Munde यांना श्रद्धांजली वाहावी लागली होती, आज अजितदादांना श्रद्धांजली अर्पण करण्याची वेळ आल्याचे दुःख त्यांनी व्यक्त केले.

पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आयोजित
१३ - १५ फेब्रुवारी, २०२६
महा पशुधन एक्स्पो
परळी वैजनाथ



### 50 टक्क्यांपर्यंत अनुदान योजनांचा लाभ घ्या; शेतकरी-पशुपालकांना मार्गदर्शन

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज करणार बक्षीस वितरण

### तरुणांना उद्योगाची दिशा


■ "तरुणांनी पशुधनावर आधारित व्यवसायाला द्योगाची जोड द्यावी. नोकरी करणाऱ्यांपेक्षा नोकरी देणारे व्हा," असे आवाहन करत पंकजा मुंडे यांनी राज्य शासनाच्या ५० टक्क्यांपर्यंत अनुदान असलेल्या विविध योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. "प्रदर्शनातील विविध जातीच्या पशूं सोबत फोटो काढा. मी किंवा धनंजय इथलेच आहोत, आम्ही नेहमी उपलब्ध आहोत. हे प्रदर्शन तुमच्या भविष्यासाठी दिशा ठरवणारे आहे," असेही त्या म्हणाल्या.

### आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राहणार उपस्थित

आज मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उत्कृष्ट पशुधन स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. तसेच ते उपस्थित शेतकरी व पशुपालकांना मार्गदर्शन करणार आहेत. त्यांच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाकडून सुरक्षा व नियोजनाच्या दृष्टीने विशेष तयारी करण्यात आली आहे. महापशुधन एक्सपोमुळे शेतकरी व पशुपालकांना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख, व्यवसायवृद्धीच्या संधी आणि अनुदान योजनांची माहिती एकाच ठिकाणी मिळत असल्याने हा उपक्रम ऐतिहासिक ठरत आहे. परळी नगरीत या निमित्ताने मोठी उत्साहाची लाट उसळली असून,परळी नगरीत या ऐतिहासिक कार्यक्रमामुळे उत्सवाचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिकांनी शिस्तीत उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### पशुधन प्रदर्शनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून भरविण्यात आलेल्या या भव्य एक्सपोमध्ये विविध जातींचे पशुधन, आधुनिक तंत्रज्ञान, दुग्ध व पशुव्यवसायातील नवनवीन संकल्पना आणि शासनाच्या अनुदान योजनांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आली आहे. तीनशेहून अधिक माहितीपर स्टॉल्समुळे प्रदर्शनाला राष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे. या प्रदर्शनात पशुव्यवसाय, कृषी, बचत गट आणि संबंधित योजनांबाबत माहिती देणारे तीनशेहून अधिक स्टॉल्स उभारण्यात आले आहेत. आधुनिक तंत्रज्ञान, सुधारित जाती, उत्पादनवाढीच्या पद्धती आणि व्यवसायिक संधी यांची सविस्तर माहिती येथे उपलब्ध आहे.



### महा पशुधन एक्स्पो2026

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित रहा : राजेश गित्ते

पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आयोजित
१३ - १५ फेब्रुवारी, २०२६
महा पशुधन एक्स्पो
परळी वैजनाथ





■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :

लोकनेत्या मा ना पंकजाताई गोपीनाथराव मुंडे (पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र ) यांच्या संकल्पनेतून परळी वैजनाथ येथे महा पशुधन एक्सपो -2026(13-15फेब्रुवारी) आज दिनांक 14/02/2026रोजी महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री मा ना श्री देवेंद्र फडणवीस भेट देऊन मार्गदर्शन करणार आहेत.

या कार्यक्रमास सर्व पदाधिकारी, सरपंच, चेअरमन, नागरिक, युवक, युवती यांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन परळीभाजपा तालुका अध्यक्ष राजेश गित्ते यांनी केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने राष्ट्रीय स्तरावरील तीन दिवसीय ऐतिहासिक 'महापशुधन एक्सपो'चे उद्घाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते आज



वैद्यनाथ महाविद्यालया समोरील ओपळे मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडले. या प्रदर्शनात पशुपालकांना गायी, म्हशी, घोडे, शेळ्या-मेंढ्या आणि विविध पक्ष्यांच्या दर्जेदार प्रजाती पाहायला मिळणार आहेत. केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशातील प्रगतशील पशुपालक व शेतकरी या ठिकाणी हजेरी लावली आहे. महाशिवरात्र आणि महा पशुधन एक्सपो हा अत्यंत सुंदर योगायोग आहे. पशुपालकांनी या तीन दिवसीय प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री गित्ते यांनी केले आहे. महा पशुधन एक्स्पो2026, आज मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमास मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन राजेश गित्ते यांनी केले आहे.

# शिलाँग



भारताच्या पूर्वोत्तर राज्यामधील मेघालयची राजधानी असलेले शिलाँग हे ठिकाण देश विदेशातील पर्यटकांना पर्यटनाचा मनमुराद आनंद मिळवून देण्यासाठी प्रसिद्ध आहे. भारतीय संस्कृतीचे वेगळे दर्शन आणि भौगोलिक विविधता यांचे सुंदर दर्शन येथे घडते. बारमाही वाहणारे झरे, धबधबे, चोहोबाजूंना असलेली हिरवाई, दर्या, डोंगर आणि नाना प्रकारच्या जातींचे महाकाय वृक्ष, या वृक्षांच्या फांद्या आणि मुळांपासून बनविले गेलेले सुंदर पूल अशी भरपेट मेजवानी पर्यटकांना भुरळ घालत असते.

मेघालय याचा अर्थच आहे मेघांचे निवासस्थान. या भागात पाऊस खूप पडतो. शिलाँगवर ब्रिटीश वास्तू आणि खाद्यपेयांचा दाट पगडा आहे. पाहण्यासारखी अनेक सुंदर ठिकाणे असलेले या राज्यात प्रामुख्याने आदिवासी जमातींची वस्ती आहे. हत्तीचा भास होणारा आणि तीन टप्प्यात पाणी कोसळणारा हाथी झरना हे येथल्या आकर्षणातले मुख्य आकर्षण म्हटले पाहिजे. पाहाल तेथे निसर्गसौंदर्याची रेलचेल असलेले शिलाँग नितांतसुंदर पण छोटेसे शहर आहे. येथून 8 किमीवर असलेला एलिफंटा फॉल पाहायलाच हवा. चेरापुंजी हे सर्वाधिक पावसाचे ठिकाण येथून 56 किमीवर आहे. सततच्या पावसामुळे दाट झाडी आणि अतिविशाल वृक्षांची येथे दाटीच असून त्यातील काही वृक्ष केवळ याच भागात आढळतात. या भागात या अतिविशाल वृक्षांची मुळे आणि फांद्या बांधून मोठमोठे पूल तयार केले गेले असून ते अतिशय मजबूत आहेत. एकावेळी 50 लोक या पुलांवरून सहज जाऊ शकतात.



डॉन बास्को सेंटर हे सांस्कृतिक संग्रहालय, शिलाँग पीक हा 1966 मीटर उंचीचा भाग, घोड्याच्या नालाचा आकार असलेले मानवनिर्मित वार्डस सरोवर, बोटॅनिकल गार्डन, स्प्रेड इगल फॉल हा रूंद धबधबा आणि अ्रनोखे व प्रेक्षणीय असे बटरफ्लाय संग्रहालय ही येथील आणखी काही आकर्षणे. हे संग्रहालय फुलपाखरांना समर्पित आहे.

### कसे जाल ?

शिलाँगला जाण्यासाठी गुवाहाटीपासून विमान, बस, टॅक्सी अशा सेवा उपलब्ध आहेत. मार्च- एप्रिल आणि आक्टोबर नोव्हेंबर हा काळ येथे भेट देण्यासाठी चांगला काळ आहे


# भरतपूर अभयारण्य



राजस्थानातील केवलादेव या नावाने ओळखले जात असलेल्या या जंगलाचे नामकरण आता भरतपूर असे केले गेले आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत समाविष्ट असलेले हे अभयारण्य हजारो जातींच्या स्थलांतरीत पक्षांसाठी प्रसिद्ध आहे. प्रसिद्ध ब्रिटीश पक्षीतज्ज्ञ सर पीटर स्कॉट यांनी या अभयारण्याचे वर्णन जगातील सर्वात सुंदर पक्षी ठिकाण असे केले आहे. हे जंगल 250 वर्षांपासूनचे असून जंगलात असलेल्या शिवमंदिरावरून त्याला केवलादेव असे नाव पडले होते. हे शंकराचे एक नाव आहे. 10 मार्च 1982 या दिवशी त्याला राष्ट्रीय उद्यानाचा दर्जा दिला गेला व 1985 साली ते जागतिक वारसा यादीत समाविष्ट केले गेले.

### पक्ष्यांचा स्वर्ग

नेहमी आढळणाऱ्या पक्ष्यांबरोबरच येथे बदके, ग्रेटर स्पॉटेड इगल्स ( गरूड ), इस्टर्न इंपिरियल ईगल्स, आढळतात तसेच नामशेष होऊ घातलेले सायबेरियन क्रेन यांचे हे ब्रिडींग ठिकाण आहे. त्याबरोबरच पेलिगन, रेड काईट, गिधाडे, मार्बल्ड टील, बैकल टील या पक्ष्यांचा हा स्वर्ग म्हणून ओळखला जातो. सस्तन प्राण्यांत लांडगे, तरस, नीलगाई, ठिपक्यांची हरणे आढळतात.



या जंगलाच पक्षी इतक्या प्रचंड संख्येने आहेत की 1938 साली तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड लिडिंग्लो यांनी एकाच शिकारीत 4273 पक्षी मारले होते अशी कथा सांगतात. अभयारण्य घोषित होण्यापूर्वी हे जंगल भरतपूर च्या महाराजांचे शिकारस्थळ म्हणून ओळखले जात होते. या पक्षीजंगलाचे मुख्य आकर्षण आहेत सारस पक्षी. अभयारण्याची वेळ सूर्योदय ते सूर्यास्त अशी असली तरी पक्षी पाहायचे असतील तर अगदी पहाटेच म्हणजे सूर्योदयापूर्वीच येथे पाहोचायला हवे.

### जाण्यासाठी मार्ग

येथे जाण्यासाठी जवळचा विमानतळ जयपूर आणि दिल्ली आहेत. रेल्वेने भरतपूर स्टेशनला उतरता येते. हिवाळा येथील चांगला हंगाम. नोव्हेंबर ते मार्च या काळात येथे स्थलांतरीत पक्षी खूप मोठ्या संख्येने येतात.

# सांस्कृतिक खजिन्याचे कच्छ



देशामध्ये मोठ्या प्रमाणात पारंपरिक पर्यटन स्थळे आहेत. मात्र कच्छ हे आपल्या वेगळेपणामुळे आणि सौंदर्यामुळे तग धरून उभा आहे. हा देशातील सर्वात मोठा जिल्हा असल्याने एक भौगोलिक आश्चर्य तर आहेच पण येथे सांस्कृतिक खजिना दडलेला आहे. यामुळे पर्यटकांनी कोणताही विचार न करता याचा प्रवास सुरू करून सुंदर आठवणी घेऊन जावे.

### कच्छचे रण

कच्छचे रण वास्तव्यासाठी योग्य ठिकाण नसले तरीही पर्यटकांनी या ठिकाणाला नक्की भेट द्यावी. येथील क्षारयुक्त जमिनीवर जेथे दृष्टी जाईल तेथे दूरपर्यंत मैलोन मैल पांढरी रेती पसरलेली बघायला मिळते. तुम्ही त्याचे ते रुप डोळ्यात आणि कॅमेऱ्यात साठवून ठेवू शकता. तसेच दिवसा सूर्याच्या किरणांमध्ये न्हाऊन निघालेले लुकलुकणारे रेतीचे कण अनुभवता येतात आणि तर रात्री चंद्राचे आगमन झाल्यानंतर निळसर प्रकाशामध्ये न्हाऊन निघालेला हा प्रदेश थेट चित्रातून बाहेर उतरल्यासारखा भासतो.

### भूजमधील सहल

भूज कच्छची राजधानी आहे आणि हे शहर 16 व्या शतकातील एक संस्थानही होते. येथील विखुरलेल्या वैभवशाली आणि उत्तमरित्या जतन केलेल्या राजवाड्यांच्या स्वरुपातील या शहराचा राजेशाही थाट अजूनही पाहता येतो. यामध्ये सर्वोत्तम कल्पना म्हणून ताज महाल, आईना महल यांचा समावेश आहे.

### मांडवीमध्ये पक्षी निरीक्षण

मांडवी भारतातील जुन्या बंदरापैकी एक आहे आणि आज येथे अनेक पक्षी निरीक्षक मोठ्या प्रमाणात येतात. अक्षरशः वेड्यासारखे येथील अगणित प्रकारच्या पक्ष्यांचे सौंदर्य अनुभवतात. येथे पेलिकन्स, फ्लेमिंगो आणि अनोख्या प्रकारची बदके या सारख्या असंख्य पक्षांच्या प्रजातींचे थवे कोणत्याही पाणीसाठ्याजवळ आढळतात. मग ते तळे असो, दलदलीचा प्रदेश असो किंवा वाहणारे पाणी असो.



### कशी भेट द्याल ?

भूजमध्ये रेल्वे स्टेशन आणि विमानतळ आहे. तुम्ही मुंबई, अहमदाबाद, राजकोट, भावनगर या ठिकाणांपासून भूजसाठी बसेस घेऊ शकता.

# सैफ उल मलूक

### मे, जूनमध्ये जाणे उत्तम

या ठिकाणी जाण्यासाठी बाकी सोपस्कार करण्यापूर्वी हे लक्षात ठेवावे की मे जून हा येथे जाण्यासाठीचा सर्वात चांगला काळ आहे. थंडीत हे सरोवर बर्फाने गोठलेले असते त्यामुळे चहूबाजूला बर्फाशिवाय कांही दिसत नाही हे लक्षात ठेवून आपले प्रवासाचे शेड्यूल ठरवावे.

# पाकचे सुंदर सरोवर

पाकिस्तान म्हटले की शत्रू राष्ट्र असा भारतीयांचा समज होतो तसेच जगभरातील देशात पाकिस्तानची ओळख दहशतवादाला खतपाणी घालणारा देश अशी झाली आहे. मात्र हा देश अनेक नितांत सुंदर पर्यटनस्थळांनी परिपूर्ण असल्याची माहिती खूपच थोड्या लोकांना आहे. भारत पाक सीमेवरील तणाव हा नेहमीच धगधगता मुद्दा असला तरी आजही अनेक पाकिस्तानी भारतात पर्यटनासाठी येतात तसेच अनेक भारतीयही पाकमध्ये पर्यटनासाठी जात असतात.

पाकिस्तानच्या खैबर जिल्ह्यातील सैफ उल मलूक सरोवर हे असेच भारतीय पर्यटकांचे आवडते पर्यटन स्थळ आहे. पशिर्यन युवराज सैफ उल मलूक यांच्या आठवणीत रमलेले हे स्थळ येथील अतिरम्य सरोवरासाठी आणि नितांतसुंदर निसर्गासाठी प्रसिद्ध आहे. या सरोवरात मिळणारे ब्राऊन ट्राऊट मासेही अतिशय प्रसिद्ध आहेत. सात किलो वजनाचे हे मासे पर्यटकांसाठी खास आकर्षण आहेत. आपल्या नंदनवनाची म्हणजे काश्मीरची आठवण करून देतील असे निळे बर्फाचे डोंगर, दूरवर पसरलेली हिरवाई, नितळ पाणी आणि स्वच्छ ताजी हवा तसेच मनाला निवविणारी शांतता ही येथली खास वैशिष्ठये.



# निसर्ग सौंदर्याने नटलेले अंदमान

बंगालच्या उपसागरात असलेली अंदमान आणि निकोबार ही बेटे भारताच्या मुख्य भूमीपासून दूर आहेत. या बेटांना आगळ्या-वेगळ्या संस्कृतीचे आणि अनोख्या निसर्ग सौंदर्याचे वलय लाभले आहे. सहलीला गेल्यावर नक्की पाहावा असा हा द्वीपसमूह आहे.

### नीरव शांततेसाठी

तुम्ही एखाद्या शांत जागेचा शोध घेत असाल तर अंदमान बेट एक उत्तम पर्याय आहे. उष्ण कटिबंधीय प्रदेशातील बंगालच्या खाडीजवळ हे बेट आहे पांढरे शुभ्र समुद्रकिनारे आणि हिरवेगार दाट जंगल हे अंदमानचे वैशिष्ट्य. निरनिराळे प्रकारचे प्राणी आणि वनस्पती यांच्या संचाराने या बेटाची शोभा अजूनच वाढते. साहसप्रेमी पर्यटकांसाठी स्कुबा ड्रायव्हींग, स्नॉरकेलिंग आणि मासे पकडण्यासाठी अंदमानचे समुद्र म्हणजे पर्वणीच.


उष्ण कटिबंधीय वनांनी युक्त घनदाट जंगले आणि लांबच लांब वाळूचे समुद्रतट असलेल्या प्रसिद्ध हॅवलॉक बेटाचा दौरा तर प्रत्येक पर्यटकाने करावा असाच आहे. हॅवलॉक, विजयनगर, राधानगर आणि एलिफंट समुद्रतट म्हणून प्रसिद्ध आहे. येथे तुम्ही स्कुबा डायविंग, स्नोर्कलिंग आणि मासेमारी करू शकता.

अंदमानची राजधानी पोर्ट ब्लेअर येथे एक ब्रिटीशकालीन ऐतिहासिक तुरुंग आजही भारतीय स्वातंत्र्यसैनिकांच्या आहूतीची साक्ष देत उभे आहे. आता त्याचे रुपांतर एका स्मारकात करण्यात आले आहे. निसर्गसंपन्नता आणि ऐतिहासिक वारसा या दोन्ही गोष्टी जर सोबतच अनुभवायच्या असतील तर याला भेट देणे योग्य ठरेल.

# आखाती देशातील ओमान



आखाती देशांकडे अनेकदा वेगळ्या नजरेने बघितले जाते. मग ते दुबईसारख्या देशातील सर्व सुविधांनी युक्त जीवनशैली असो किंवा सौदी अरेबियाचे प्रचंड वाळवंट. परंतु येथील ओमान हे एक विशेष स्थान लक्ष वेधून घेते ते त्याच्या अद्वितीय भूप्रदेश आणि संस्कृतीमुळेच. तुम्ही निश्चितपणे ओमानच्या प्रवासाची योजना का करावी हे जाणून घ्या...



### फ्रॅन्किसेन्स रोड

प्राचीन फ्रॅन्किसेन्स रोडवर सलालाहची घरे आहेत. शहराच्या कारावान मार्गावर या घरांची सुधारणा केली आहे. हे स्थान येथे आढळणाऱ्या सुवासिक राळसाठी प्रसिद्ध आहे. फ्रॅन्किसेन्स लॅण्ड संग्रहालयाला भेट द्या. जी ओमनच्या तेजस्वी आणि रंगीत इतिहासाला उज ाळा देते. फ्रॅन्किसेन्सची झाडेही आपण येथे पाहू शकतो. येथे या स्फटीकांची चांगल्या दरामध्ये विक्री होते. शबा राणीच्या काळात याच्या विक्रीला सुरुवात केली होती.


### वाडीमध्ये क्षणभर विश्रांती

मस्कट-सूर महामार्गावर मध्य-पूर्वमध्ये एक नयनरम्य ड्राइव्ह आहे. अरेबिया गोड्या पाण्यातील तलाव आहे. हा जलस्त्रोत वाडीज म्हणून ओळखला जातो. ही उष्णता कमी करण्याची उत्तम जागा आहे. वाडीला सहसा वाळवंटात वाळूचा खडक व्यापलेला आहे. त्याच्या भव्य भिंती करून तलावाला घेरले जाते. मात्र ओमन वेशभूषांबाबतीत पुराणमतवादी आहे. यामुळे सभ्यतेबाबत कठोर मार्गदर्शक तत्वांची खात्री करून घ्या.

### रस-अल-जिंझ कासव केंद्र

रस-अल-जिंझ कासव केंद्रामध्ये ऑलिव्ह रिडले समुद्रातले आणि हिरव्या समुद्रातले दुर्मिळ प्रजातीचे कासव आढळण्याची उत्तम जागा आहे. टूर मार्गदर्शक आपल्याला प्राण्यांबद्दल माहिती देतो. तुम्ही रात्री उशिराची टूर घेतली तर वॉडलिंगसारखे वाळूमध्ये चटकन न आढळणारा प्राणी पाहू शकता.

# मन:शांतीची अनुभूती देणारी चामरलेणी



म्हसरूळ (नाशिक) येथील चामरलेणी (गजपंथ) जैनधर्मीयांचे महत्त्वाचे तीर्थक्षेत्र आहे. देशभरातून भाविक व पर्यटक या क्षेत्राला वर्षभर भेट देतात. त्यावर एक दृष्टिक्षेप... म्हसरूळ येथील चामरलेणी (गजपंथ) हे दिगंबर जैन पंथीयांचे प्रसिद्ध तीर्थक्षेत्र. ही लेणी केवळ ऐतिहासिक वा धार्मिकच नव्हे, तर अनोख्या निसर्गसौंदर्याचं शांतीसह अनुभूती देणारे सिद्धक्षेत्र बनले आहे. भाविक दूरवरून येथे येऊन आपले दोष, राग-द्वेष, वासना, अहंकार या सर्वांचाच या शांतिस्थळावर त्याग करतात. येथे प्रत्येक ऋतूत भाविकांची वर्दळ असते.

### शुभ्र लेण्यांचे दर्शन

म्हसरूळ गावापासून 4 किलोमीटरवरील निसर्गसौंदर्याने नटलेला पर्वत पांढऱ्या शुभ्र लेण्याला छातीवर घेऊन उभा असतो. हे दृश्य पाहून भाविक या पर्वताच्या प्रेमातच पडतो. उल्हसित मनाने वाटचाल करतो या शांतिस्थळाकडे. अशा उत्साहपूर्ण वातावरणात भाविकासमोर या पर्वताच्या पायथ्याशी असेलेले मंदिर येते. त्याच्या छोट्या गाभाऱ्यांत चारही दिशांना श्वेतवर्णाच्या पद्मासनातील मूर्ती आहेत. तेथेच दोन फूट उंचीची पार्श्वनाथांची श्वेतवर्ण पद्मासन प्रतिमा आहे. जवळच क्षेमेंद्रकीर्तींची समाधी आहे. या मंदिरातून बाहेर पडताच पर्वतावरील लेणी खुणावत असतात. हिरव्या रंगाचे प्रदर्शन करणारा हा पर्वत काळ्याशार दगडांची वाट अंगभर घेऊन छातीवरील लेण्यात येण्याचे जणू आव्हानच देत असतो.

### श्वेतवर्ण चरण

सृष्टीसौंदर्य न्याहळत सुमारे 435 पायऱ्या चढून जेव्हा यात्रेकरू या पर्वतावरील गुंफांत प्रवेश करतो तेव्हा त्याला प्रथम जाणवते ती विलक्षण निरव शांतता. सुरुवातीला उजव्या हाताला छोट्या शिखराखाली तीन श्वेतवर्ण चरण आहेत. ते सुदर्शन, नंदी आणि नंदीमित्र या बलभद्रांचे आहेत. शिखरावर सुव्रत, सुधर्म, गजकुमार, अचल आणि विजय या बलभद्रांचे चरण आहेत. त्यांच्याजवळच नव्यानेच उभारलेली दोन मंदिरे आहेत. एका गुंफेत भगवान पार्श्वनाथांची प्रतिमा आहे. ती उत्खननात मिळाली आहे. ती पूर्ण आणि अत्यंत मनोहरी श्यामवर्णीय मूर्ती नजर खिळवून ठेवते. ती दहा फूट चार इंच उंचीची पद्मासन प्रतिमा आहे. चारित्र्य चक्रवर्ती आचार्य शांतिसागरजींच्या मार्गदर्शनाखाली तिची स्थापना केली आहे.

### प्राचीन गुफा

मार्गशीर्ष शुक्ल 10, संवत 1664 मधील ही घटना आहे. दुसरे मंदिर वीर संवत 2460 मध्ये उभारले. उजव्या बाजूला एक फूट पाच इंच उंचीची कत्थई वर्णाची भगवान पद्मप्रभू यांची, तर डाव्या बाजूला भगवान वासुपूज्य यांची प्रतिमा आहे. या प्रतिमांशेजारीच तीर्थस्थळांवरील शांततेची अनोखी अनुभूती देणाऱ्या दोन प्राचीन गुंफा आहेत. त्या भाविकांना वेगळ्याच विश्वात घेऊन जातात. स्वत्व विसरायला लावतात. या गुफांचा इतिहास ज्ञात नाही. प्रतिमांना लेप लावलेला आहे. त्यामुळे त्यांची निर्मिती कोणत्या काळात झालेली आहे, याचे अनुमान निघत नाही. समोर वेदीवर एक शिलाफलकात तीन श्यामवर्णीय,चार फूट पाच इंच उंचीच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. प्रत्येक प्रतिमांच्या दोन्ही बाजूला स्तंभ आहेत. त्यावर सर्वांत वर पद्मासन, मध्ये जंजीर आणि खालच्या बाजूला खड्गासन प्रतिमा अंकित आहेत. प्रतिमांवर छत्र असून, त्याच्या दोन्ही बाजूंना तूर्यवाद्ये आहेत. या छत्रावर एका हातात चामर, तर दुसऱ्या हातात फळे घेतलेली देवी, तसेच त्याच्याहीवर किचक आहे. बाजूलाच भक्त हात जोडून बसला आहे. या गुंफांत पद्मासन आणि खड्गासनस्थ मूर्ती आहेत. या गुंफेतील बाहेरच्या कक्षात भिंतीतच साडेसहा

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# श्रीलंकेत भाग्यश्री वर्तक यांना 'सोशल एक्सलन्स इंटरनॅशनल अवॉर्ड'

## 33 वर्षांच्या सेवाभावी कार्याला आंतरराष्ट्रीय गौरव

घाटकोपर | (केतन भोज)

कर्णबधिर, दिव्यांग व आदिवासी समाजासाठी गेली तीन दशके अहोरात्र कार्य करणाऱ्या भाग्यश्री राजेंद्र वर्तक यांना नुकताच सोशल एक्सलन्स इंटरनॅशनल अवॉर्ड प्रदान करण्यात आला. हा भव्य आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळा श्रीलंका, कोलंबो येथील स्वामी विवेकानंद कल्चरल सेंटर हाय कमिशन ऑफ इंडिया येथे पार पडला. हा सन्मान म्हणजे त्यांच्या 33 वर्षांच्या समर्पित सामाजिक, शैक्षणिक व दिव्यांग सक्षमीकरणाच्या कार्याचा आंतरराष्ट्रीय स्तरावरील गौरव आहे. भाग्यश्री वर्तक या 2024 मध्ये मुख्याध्यापिका पदावरून निवृत्त झाल्या असल्या तरी कर्णबधिर मुले व आदिवासी समाजासाठीचे त्यांचे कार्य आजही अविरत सुरू आहे.

त्या 'शुभ्रा प्रकल्प' या उपक्रमाच्या संस्थापिका असून, आतापर्यंत त्यांनी शेकडो कर्णबधिर व आदिवासी व्यक्तींना खेळणी, टोप्या, वह्या, स्कूल बॅग, युनिफॉर्म व दिवाळी फराळ अशा स्वरूपात मदत केली आहे. दिव्यांगांचे सक्षमीकरण, रोजगार निर्मिती व सर्वसमावेशक शिक्षणासाठी त्या सातत्याने कार्यरत आहेत. भाग्यश्री वर्तक यांनी टोटल कम्युनिकेशन पद्धतीद्वारे शेकडो दिव्यांग शाळांतील शिक्षकांना प्रशिक्षण दिले आहे. त्या जंग नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ स्पीच अँड हिअरिंग डिसबिलिटीज येथे अतिथी व्याख्याता म्हणूनही कार्य करतात.

न्यायालयीन प्रक्रिया, तपास यंत्रणा व कायदा अंमलबजावणी संस्थांसाठी त्यांनी सांकेतिक भाषा दुभाषी म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून, त्यामध्ये मुंबई पोलीस व सीआयडी यांचा समावेश आहे. तसेच दिव्यांग मंत्रालयाच्या उद्घाटन प्रसंगी त्यांनी माननीय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व मंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या भाषणांचे सांकेतिक भाषेत भाषांतर करून कर्णबधिर व्यक्तींना समजावले होते. त्या दिव्यांग क्रिकेट कंट्रोल बोर्ड ऑफ इंडियाच्या महाराष्ट्र अध्यक्षा असून, स्टँडिंग डिसेबल्ड मुला-मुलींच्या प्रगतीसाठी सक्रिय आहेत. तसेच राष्ट्रीय दिव्यांग ट्रॉफीसाठी त्यांची दिव्यांग क्रिकेट कंट्रोल बोर्ड ऑफ इंडियाच्या जॉइंट सेक्रेटरी या पदावर निवड झाली आहे.

याशिवाय त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीच्या महाराष्ट्र दिव्यांग शाखेच्या अध्यक्षा म्हणूनही कार्यरत असून, दिव्यांगांच्या कौशल्य विकास, प्रशिक्षण व रोजगार निर्मितीवर विशेष लक्ष केंद्रित करत आहेत. त्यांचे सर्वात उल्लेखनीय कार्य म्हणजे सायलेंट इंडियन नॅशनल अँथम. कर्णबधिर व्यक्तींनी सादर केलेल्या या राष्ट्रगीताच्या त्या प्रमुख सहाय्यक होत्या. या उपक्रमाला कान्स फेस्टिव्हलमध्ये तीन पदके मिळाली असून, त्यांनी आजवर 400 ते 500 कार्यक्रमांत हे राष्ट्रगीत सादर केले आहे. गोवा व दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय परिषदांचे उद्घाटनही या राष्ट्रगीताने झाले आहे.

तसेच त्यांनी स्पेशल ऑलिंपिक भारतसाठी समन्वयक म्हणून काम केले असून, बौद्धिक अक्षम मुलांसाठी गीत व जिंगल तयार केले आहे. निवडणूक प्रक्रियेत दिव्यांगांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठीही त्यांनी विशेष गीत लिहिले आहे. हा आंतरराष्ट्रीय पुरस्कार सोहळा डी. एस. राठोड फाउंडेशन, मार्शल योगा अकॅडमी व सर्किट बेंच फाउंडेशन संचलित इंडियन पोलीस मित्र भारत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमामुळे भारत–श्रीलंका मैत्रीपूर्ण संबंध अधिक दृढ होत असून, भारतीय सेवाभावी कार्याला जागतिक स्तरावर मान्यता मिळाल्याचे आयोजक सुरेश राठोड व डॉ. संजय गिरी यांनी नमूद केले.




# व्हॅलेंटाईन डे : प्यार दिखा रहे हैं, या जता रहे हैं?

प्रेम ही मानवी जीवनातील सर्वात सुंदर आणि कोमल भावना आहे. ती नात्यांना अर्थ देते, जीवनाला उब देते आणि व्यक्तिमत्त्वाला समृद्ध करते. परंतु आजच्या डिजिटल आणि वेगवान युगात आपण प्रेम अनुभवतो आहोत की त्याचे प्रदर्शन करतो आहोत, याचा गंभीर विचार करण्याची वेळ आली आहे. मग प्रश्न पडतो — तरुणाईचं नेमकं काय चुकतंय?

प्रथम हे स्पष्ट केले पाहिजे की तरुणाई चुकतेच असे नाही. प्रत्येक पिढी आपापल्या काळाच्या प्रभावाखाली घडत असते. आजची तरुणाई तंत्रज्ञान, सोशल मीडिया आणि जागतिक संस्कृतीच्या प्रभावात वाढली आहे. तिच्यासाठी भावना व्यक्त करणे खुलेपणाने आणि सार्वजनिकरित्या करणे हे स्वाभाविक आहे. त्यामुळे व्हॅलेंटाईन डे साजरा करणे ही चुकीची गोष्ट ठरत नाही. उलट, भावना दडपून न ठेवता व्यक्त करणे हे मानसिक आरोग्यासाठीही




चांगले आहे.

मात्र समस्या तेव्हा निर्माण होते, जेव्हा भावना "दाखवण्याच्या" स्पर्धेत रूपांतरित होतात. सोशल मीडियामुळे प्रेमाचे सार्वजनिक प्रदर्शन वाढले आहे. गुलाब दिला, गिफ्ट दिलं, सेल्फी काढली, स्टोरी टाकली — आणि मग वाट पाहिली लाईक्सची. प्रतिसाद



**डॉ सुवर्णा कराड ,**
**(प्रदेशाध्यक्ष वंजारी महासंघ महिला आघाडी)**

जास्त मिळाला तर आनंद; कमी मिळाला तर असुरक्षितता. प्रेमाची खरी खोली मात्र या डिजिटल मोजपट्टीत मोजता येत नाही. तरुणाई इथे चुकते — ती भावना आणि तिचे प्रदर्शन यातील फरक विसरते.

पूर्वी प्रेम ही अंतर्मनातील, शांत आणि संयत भावना होती. ती मोठ्या घोषणांत नव्हे, तर कृतीत दिसत असे. आई-वडिलांचे प्रेम त्यागातून जाणवत असे; मैत्री विश्वासातून टिकत असे; आणि प्रियकर-प्रेयसीचे नाते परस्पर समजुतीतून बळकट होत असे. त्या वेळी एका दिवसाची गरज नव्हती. आज मात्र व्हॅलेंटाईन डे हा प्रेमाचा "प्रमाणपत्र दिवस" बनू लागला आहे. हा बदल चिंतेचा आहे.

व्यापारीकरण ही आणखी एक मोठी बाब आहे. बाजारपेठेने व्हॅलेंटाईन डेचा मोठा उत्सव बनवला आहे. महागड्या भेटवस्तू, विशेष ऑफर्स, सजावट — या सर्वांनी प्रेमाचा अर्थ खर्चाशी जोडला आहे. "जितका खर्च तितके प्रेम" हा संदेश नकळत तरुणांच्या मनात जातो. आर्थिक मर्यादा असलेल्या तरुणांवर अनावश्यक दबाव येतो. इथे तरुणाईची चूक नसून, बाजारव्यवस्थेचा प्रभाव अधिक आहे; पण विवेकाने निर्णय घेण्याची जबाबदारी मात्र तरुणाईचीच आहे.

याचबरोबर तुलना संस्कृती ही समस्या आहे. "इतरांनी काय केले?" या प्रश्नाने स्वतःच्या नात्यांचे मूल्यमापन होऊ लागते. सोशल मीडियावर दिसणारे आनंदी फोटो वास्तवाचे संपूर्ण चित्र नसते, हे विसरले जाते. परिणामी नात्यांमध्ये अवास्तव अपेक्षा निर्माण होतात. तरुणाई इथेही चुकते — ती वास्तव आणि आभासी जग यांतील सीमारेषा धूसर करते.

पण याचा अर्थ असा नाही की तरुणाई दिशाहीन आहे. उलट, आजची तरुणाई अधिक जागरूक, आत्मविश्वासी आणि संवादक्षम आहे. ती समानतेवर आधारित नात्यांची अपेक्षा ठेवते. ती भावनांना महत्त्व देते. हे सकारात्मक आहे. प्रश्न फक्त इतकाच आहे की त्या भावनांना प्रामाणिकतेची जोड किती आहे?

खरे प्रेम दाखवावे लागते का? की ते जाणवते? हा मूलभूत प्रश्न आहे. प्रेम जर खरे असेल, तर ते दैनंदिन आयुष्यातील छोट्या कृतीतून दिसते — कठीण प्रसंगी साथ देणे, समजून घेणे, माफ करणे, आणि एकमेकांच्या स्वप्नांना पाठबळ देणे. व्हॅलेंटाईन डे हा त्या प्रेमाची आठवण करून देणारा एक निमित्त असू शकतो; पण नात्यांची खरी परीक्षा उरलेल्या दिवसांत होते.

तरुणाईचे चुकणे हे तिच्या भावनांमध्ये नाही; तर कधी कधी प्राधान्यक्रमांमध्ये असते. प्रदर्शनाला प्राधान्य देताना अनुभव मागे पडतो. पोस्टला महत्त्व देताना संवाद कमी होतो. बाह्य आकर्षणाला जपताना अंतर्गत समजुतीकडे दुर्लक्ष होते. ही जाणीव झाली, तर मार्ग सुकर होईल.

व्हॅलेंटाईन डेच्या निमित्ताने तरुणाईने स्वतःला एक प्रश्न विचारावा — आपण प्रेम "जगतो" आहोत की "दाखवतो" आहोत? जर प्रेम खरे असेल, तर त्याला लाईक्सची गरज नसते; त्याला विश्वासाची गरज असते. त्याला खर्चाची गरज नसते; त्याला समर्पणाची गरज असते.

शेवटी, तरुणाई चुकत नाही — ती शोधत असते. प्रेमाचा अर्थ, नात्यांचे महत्त्व, आणि स्वतःची ओळख ती शोधत असते. या शोधात विवेक, संयम आणि प्रामाणिकता यांची साथ मिळाली, तर व्हॅलेंटाईन डे केवळ प्रदर्शनाचा दिवस न राहता मूल्याधारित प्रेमाची जाणीव करून देणारा दिवस ठरेल. आणि मग "तरुणाईचं काय चुकतंय?" हा प्रश्नच उरणार नाही.

लोकरंग

# साप्ताहिक संवाद : आक्षेपार्ह एआय निर्मितीवर सोशल अंकुश



कृत्रिम बुद्धिमत्ता अर्थात एआय चा सध्या सर्वच क्षेत्रात वेगाने प्रसार आणि प्रचार होत आहे. परंतु त्याच वेळी कृत्रिम बुद्धिमत्तेच्या [ए आय ] साहाय्याने तयार केले जाणारे फोटो,व्हिडीओ आणि माजकारावरून केंद्र सरकारने समाजमाध्यमांसाठी कठोर नियमावली प्रसूत केली आहे. एआय निर्मित कोणत्याही आशयावर तसा सुस्पष्ट उल्लेख करण्याबरोबरच अश्लील,आक्षेपार्ह,बेकायदा मजकूर हटविण्याची मुदत ३६ वरून ३ तासावर आणण्याची तरतूद केंद्राने केली आहे. याच पार्श्वभूमीवर संगणक तज्ज्ञ अमेय गोगटे यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**- एआय निर्मित कोणत्याही पोस्टवर केंद्र सरकारने समाजमाध्यमांसाठी कठोर नियम लागू केलेले आहेत?**

येत्या २० फेब्रुवारीपासून समाजमाध्यमांवर कृत्रिम बुद्धिमतेचा वापर करून पसरवले जाणारे अश्लील,बनावट आणि दिशाभूल करणारे फोटो आणि व्हिडीओ रोखण्यासाठी केंद्र सरकारने हे महत्वाचे पाऊल उचलले असून फेसबुक,व्हाट्स अप,इंस्टाग्राम,ट्विटर असा विविध समाजमाध्यम कंपन्यांनी वापरकर्त्यांना दार तीन महिन्यांनी प्लॅटफॉर्मचे नियम आणि कायद्याचे उल्लंघन केल्यास होणाऱ्या शिक्षेबाबत इशारा द्यावा असे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने राजपत्रात अधिसूचनेत जारी केले आहे.

**- अशा प्रकारचे कठोर नियम लागू करण्याचा नेमका उद्देश काय?**

कोणत्याही वापरकर्त्याने शेअर केलेला मजकूर एआय द्वारे तयार केला आहे का ?याची पडताळणी करण्याची जबाबदारी सरकारने अशा विविध सोशल माध्यमांच्या कंपनीनवर सोपवली आहे. एआय सारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून निवडणुकांमध्ये हस्तक्षेप करणे,आर्थिक फसवणूक करणे,किंवा एखाद्याची बदनामी करणे यासारखे प्रकार डिजिटल शस्त्र म्हणून वापरले जात आहेत. हे सर्व प्रकार रोखण्यासाठीच केंद्र सरकारने अशा प्रकारची कठोर नियमावली जारी केली आहे.

**- या नियमावली मध्ये कोणत्या तरतुदी आहेत?**

केंद्र सरकारने जारी केलेल्या या नियमावली मध्ये कोणत्याही माध्यमांवरील बेकायदा आशय हटविण्यासाठी आता केवळ ३ तासांची मुदत लागू केली आहे जी पूर्वी ३६ तासांची होती. अश्लील आणि खाजगीपणाचे उल्लंघन करणारा मजकूर हटविण्यासाठीचा कालावधी आता २ तास केला आहे. ए आय च्या मदतीने तयार केलेला कोणताही फोटो,ऑडिओ किंवा व्हिडीओ असल्यास त्यावर तसे लेबल असणे आता अनिवार्य असणार आहे. एआयचा वापर करून खोटी कागदपत्रे तयार करणे,मुलांचे लैंगिक शोषण करणारा मजकूर किंवा स्फोटकांशी संबंधित माहिती यावर पूर्णपणे बंदी असणार आहे.

# चला पर्यटनाला : प्राचीन संस्कृतीचे शहर चेन्नई

चेन्नई हे शहर एकेकाळी मद्रास म्हणून ओळखले जात होते. चेन्नई हे दक्षिण भारतातील प्रमुख पर्यटन स्थळांपैकी एक आहे. चेन्नईबद्दल पर्यटकांना कायमच आकर्षण राहिले आहे. दरवर्षी हजारो पर्यटक चेन्नईला भेट द्यायला येतात. या शहरात प्राचीन संस्कृती आणि अधुनिक जीवशैलीचा संगम पहायला मिळतो. चेन्नईमध्ये असे अनेक पर्यटनस्थळे आहेत, तुम्ही जर चेन्नईला जाणार असाल तर या ठिकाणांना आवश्य भेट द्या.मरीना बीच हा चेन्नईची लाईफलाईन आहे. मरीना बीच हे चेन्नईमधील सर्वात मोठे पर्यटनस्थळ आहे. हा देशातील सर्वाधिक पर्यटकांची गर्दी असलेल्या समुद्र किनाऱ्यांपैकी एक किनारा आहे. दर वर्षी लाखो पर्यटक मरीना बीचला भेट देतात. एमजी फिल्म सिटी हे देखील चेन्नईमधील एक प्रमुख पर्यटनस्थळ आहे. एमजी फिल्म सिटीची स्थापना 1994 मध्ये करण्यात आली. ही फिल्म सिटी एमजी रामचंद्रन यांच्या स्मरणार्थ बांधण्यात आली असून, राज्य सरकारद्वारे या फिल्म सिटीचे संचलन केले जाते. मरुंडेश्वर मंदिर हे चेन्नईतील एक सुंदर असे मंदिर आहे. हे मंदिर चेन्नईजवळील तिरुवनमियुरमध्ये आहे. मरुंडेश्वर मंदिर हे भगवान शंकराचे मंदिर आहे. या मंदिरात जाऊन श्री मरुंडेश्वराचे दर्शन घेतल्यास सर्व आजार बरे होतात, अशी अख्यायिका आहे. कोली हिल्स हे चेन्नईमधील एक प्रसिद्ध पर्यटन स्थळ आहे. येथील निसर्गसौंदर्य येथे येणाऱ्या पर्यटकांना भूरळ घातले. ज्यांना छायाचित्रं काढायला आवडतात त्यांनी एकदा तरी या मंदिराला आवश्य भेट द्यावी असाच या मंदिराचा परिसर आहे.



# नोंद : राष्ट्रीय क्लेफ्ट दिनानिमित्त, स्माईल ट्रेन इंडियाचा जागरूकता कार्यक्रम

राष्ट्रीय क्लेफ्ट डे निमित्त, देशातील सर्वात मोठी क्लेफ्ट केंद्रित एनजीओ स्माईल ट्रेन इंडियाने नवी दिल्ली महानगरपालिका परिषद (एनडीएमसी) सोबत भागीदारी करून जागरूकता निर्माण केली आणि फाटलेले ओठ आणि टाळूच्या समस्यांसाठी जनजागृती केली. त्यांनी राष्ट्रीय राजधानीतील एनडीएमसी शाळांमध्ये एक व्यापक शाळा-आधारित सहभाग कार्यक्रम राबविला.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून, स्माईल ट्रेन इंडियाने प्राथमिक शाळेतील मुलांमध्ये लवकर जागरूकता, सहानुभूती आणि समावेश निर्माण करण्यासाठी कथाकथन, परस्परसंवादी शिक्षण आणि सर्जनशील सहभागाचा वापर करून १० एनडीएमसी शाळांमध्ये "द एबीसी ऑफ चेंज" (जागरूकता, वर्तन आणि आत्मविश्वास) सुरू केला. हा कार्यक्रम वर्गांमध्ये क्लेफ्ट जागरूकता एकत्रित करतो, मुलांना त्यांच्या शाळा, कुटुंबे आणि समुदायांमध्ये सक्रिय सहभागी




आणि बदलाचे राजदूत म्हणून स्थान देतो. या उपक्रमाचा केंद्रबिंदू स्माईल ट्रेन इंडियाची चित्रपुस्तक मालिका, "स्माईल्स दॅट शाईन" आहे, जी अशा प्रकारची पहिलीच मुलांची मालिका आहे जी चेहऱ्यावरील फरकांभोवती सहानुभूती, दयाळूपणा आणि समजुती वाढवण्यासाठी डिझाइन केलेली आहे, ज्यामध्ये फाटलेले ओठ आणि टाळू यांचा समावेश आहे. कल्पनारम्य कथाकथन आणि संबंधित पात्रांद्वारे, पुस्तके फरक सामान्य करतात, आत्मविश्वास आणि ओळखीभोवती संभाषणांना प्रोत्साहन देतात


शालेय कार्यक्रमाचा समारोप प्रसिद्ध थिएटर अभ्यासक आणि कथाकथन सुविधा देणारे राहुल खन्ना यांच्या नेतृत्वाखाली तीन दिवसांच्या सर्जनशील नाट्य कार्यशाळेने झाला.

**संकलन –संयोजनः सुबोध रणशेवरे**

---

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज करणार परळीतील डॉ.भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाच्या सुसज्ज नूतन वास्तूचे लोकार्पण

## ना. पंकजाताई मुंडे, आ.धनंजय मुंडे यांच्यासह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती;नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांची माहिती



■ परळी वैजनाथ | प्रतिनिधी

१२ ज्योतिर्लिंगां पैकी एक असलेल्या परळी वैजनाथ शहराच्या शैक्षणिक व सांस्कृतिक इतिहासात मोलाची भर घालणाऱ्या डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाच्या अत्याधुनिक नूतन इमारतीचे लोकार्पण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज दि.१४ फेब्रुवारी रोजी करणार आहेत. सुमारे ५ कोटी १२ लाख रुपयांच्या या भव्य आणि सुसज्ज वास्तूमुळे परळी वैजनाथ शहराला आधुनिक ज्ञानमंदिर प्राप्त होत आहे.

नगर परिषद परळी वैजनाथच्या वतीने हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प 'वैशिष्ट्यपूर्ण योजना' आणि 'नगरोत्थान विकास योजना (न.वि. ६)' यांच्या संयुक्त माध्यमातून साकारण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी वैशिष्ट्यपूर्ण योजनेतून ३ कोटी ३५ लाख ७९ हजार ९६२ रुपये, तर न.वि. ६ विकास योजनेतून १ कोटी ७६ लाख ४८ हजार ३९६ रुपये इतका निधी मंजूर करण्यात आला असून, एकूण प्रकल्प किंमत ५ कोटी १२ लाख २८ हजार ३५८ रुपये इतकी आहे.डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाकडे सध्या ४० हजारांहून अधिक पुस्तकांची समृद्ध ग्रंथसंपदा उपलब्ध असून, नव्या इमारतीमुळे ही संख्या एक लाखांपर्यंत नेण्याचा संकल्प करण्यात आला आहे. नूतन वास्तूमध्ये आधुनिक बहुमजली रचना, प्रशस्त व शांत वाचन कक्ष, डिजिटल लायब्ररी व हाय-स्पीड इंटरनेट सुविधा, एमपीएससी/यूपीएससी स्पर्धा परीक्षार्थींसाठी विशेष अभ्यास विभाग, बालवाचन विभाग, सुसज्ज कॉन्फरन्स हॉल, दिव्यांग स्नेही रॅम्प तसेच दुचाकी व चारचाकी वाहनांसाठी स्वतंत्र पार्किंग व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाच्या अत्याधुनिक नूतन इमारतीचे लोकार्पण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे करणार आहेत. १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता महापशुधन एक्सपोला मुख्यमंत्री उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात या वाचनालयाचे ते लोकार्पण करतील.यावेळी पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

ना. पंकजाताई मुंडे व धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली काम करताना परळी नगर परिषदेची डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालयाची ही नूतन वास्तू म्हणजे परळी वैजनाथ शहराच्या शैक्षणिक प्रगतीचा मैलाचा दगड ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मान्यवरांच्या उपस्थितीत या ज्ञानमंदिराचे लोकार्पण होणे ही शहरासाठी अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांना, स्पर्धा परीक्षार्थींना आणि ज्येष्ठ नागरिकांना दर्जेदार व आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा आमचा निर्धार या प्रकल्पातून प्रत्यक्षात उतरत आहे.हे वाचनालय केवळ पुस्तकांचे केंद्र न राहता विचार, संस्कृती आणि नव्या पिढीच्या घडणीचे केंद्र ठरणार असुन यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी व सर्व नगरसेवक, नगरसेविका नगर परिषद परळी वैजनाथ यांनी केले आहे.






### बुद्धिबळ प्रशिक्षण केंद्र आणि एआय लॅब विकसित होणार

परळीचे ज्ञानतीर्थ म्हणून येणाऱ्या काळात डॉ. भालचंद्र सार्वजनिक वाचनालय नावारूपाला येईल या दृष्टिकोनातून या ठिकाणी बहुआयामी ज्ञानकक्ष निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिके बरोबरच या ठिकाणी बुद्धिबळ प्रशिक्षण केंद्र तसेच नवीन काळाला अनुरूप अशा पद्धतीने एआय तंत्रज्ञानाची लॅब विकसित होणार आहे. वाचन संस्कृती जपण्याबरोबरच विचाराच्या कक्षा रुंदावण्याच्या दृष्टिकोनातून आवश्यक ती सर्व दालने एकाच ठिकाणी उभे करण्याचा प्रयत्न आहे. शहराच्या सर्वांगीण जडणघडणीत महत्त्वाचा पैलू असलेल्या ज्ञानवृद्धीच्या अनुषंगाने हे वाचनालय अधिकाधिक समृद्ध आणि एक ज्ञानतीर्थ बनावे या उद्देशाने नगरपरिषद काम करणार असल्याचे नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले.



# प्रा. टी.पी.मुंडे सरांनी घेतली वाव्हळे कुटुंबियांची सांत्वन पर भेट!

## दीपकच्या जाण्याने कुटुंबावर संकट; लहान भावाला सरकारी नोकरी द्यावी सरकारकडे केली मागणी!

■ परळी वैजनाथ प्रतिनिधी

मांडेखेल तालुका परळी जिल्हा बीड येथील 21 वर्षीय युवक दीपक भास्कर वाव्हळे पोलीस भरती दरम्यान धावत असताना बीड येथे त्याचा मृत्यू झाला. या पार्श्वभूमीवर शिवसेनेचे नेते प्रा. टी.पी.मुंडे सरांनी वाव्हळे कुटुंबियाची सांत्वनपर भेट घेतली आणि त्यांना धीर दिला. दीपकच्या जाण्याने कुटुंबावर मोठे संकट कोसळल्या असून त्याच्या लहान भावास महाराष्ट्र सरकारने नोकरीत सामावून घ्यावे यासंदर्भात महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब, उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे , श्रीमती सुनेत्रा पवार यांना निवेदन देणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे तसेच दीपकच्या आई वडील वृद्ध असल्याने त्यांना काम होत नाही . त्यांना आधार म्हणून मुख्यमंत्री सहायता निधीतून तात्काळ दोन लाखाची मदत करावी अशी मागणी त्यांनी सरकारकडे केली आहे.

दिनांक 11 फेब्रुवारी 2026 रोजी दीपक पोलीस होण्याचे स्वप्न उराशी बाळगून बीड येथे पोलीस भरतीसाठी शारीरिक चाचणीसाठी आला. सोळाशे मीटर धावत असताना त्याला अचानक चक्कर आल्याने तो जागीच कोसळला दरम्यान बीड जिल्हा रुग्णालय येथे त्याला घेऊन गेले असता त्याचा डीहायड्रेशन मुळे मृत्यू झाल्याची माहिती डॉक्टरांनी दिली. पोलीस होण्यासाठी गेल्या तीन वर्षापासून तो तयारी करत होता त्या दिवशी त्याच्या पोटात कसलेही अन्न नव्हते. भरतीच्या ठिकाणी कसल्याही प्रकारची नाश्त्याची व पाण्याची सोय पोलीस प्रशासनाकडून करण्यात आली नाही. संबंधित घटनेला पोलीस प्रशासन जबाबदार आहे. ही घटना अतिशय वेदनादायी आहे अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र सरकारकडे यांनी त्याच्या छोट्या भावास सरकारी नोकरी देऊन कुटुंबाचे पुनर्वसन करावे त्यासंबंधी आपण निवेदन देणार असल्याचेही त्यांनी सांगितले तसेच त्याच्या घरची परिस्थिती अत्यंत हलाखीची असून आई वडील ऊसतोड कामगार आहेत आणि लहान भाऊ ऑटो चालवतो त्यामुळे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री, गृहमंत्री यांना विनंती आहे की त्यांनी त्यांच्या छोट्या भावास सरकारी सेवेत त नोकरी देऊन सामावून घ्यावे अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच वाव्हळे कुटुंबीयांच्या दुःखात आपण सहभागी आहोत अशी भावना व्यक्त केली. यावेळी गावातील ज्येष्ठ नागरिक, महिला व युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परळी वैजनाथ येथील महापशुधन एक्स्पोचा मोठ्या संख्येने लाभ घ्या : नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई धर्माधिकारी

■ परळी वैजनाथ, प्रतिनिधी

पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून इतिहासात पहिल्यांदाच परळी वैजनाथ नगरीमध्ये देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो होत आहे .विशेष म्हणजे महाशिवरात्रीच्या पर्वकाळात ही एक मोठी पर्वणीच परळी व परिसरातील शेतकरी, पशुपालक, विद्यार्थी, नागरिकांना उपलब्ध झाली आहे. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होऊन पशुसंवर्धना बाबतच्या तज्ञांचे मार्गदर्शन, विविध जातींचे पशुपक्षी पाहण्याचा त्यांची माहिती याचा लाभ घ्यावा असे आवाहन परळीच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले आहे.

वैद्यनाथ महाविद्यालया समोरील मैदानात दिनांक 13 ते 15 फेब्रुवारी या कालावधीत देशपातळीवरील महा पशुधन एक्स्पो होत आहे. या ठिकाणी विविध जातिवंत पशु पक्षांचे प्रदर्शन, त्याचबरोबर तज्ञ मार्गदर्शकाचे मार्गदर्शन, चर्चासत्रे, पशुसंवर्धनातून रोजगार पूरक माहिती, शासनाच्या विविध योजना, पशुसंवर्धन विभागाच्या वतीने विविध माहिती आदी एक मोठी पर्वणीच परळीकरांना उपलब्ध झाली आहे. देश पातळीवरील अशा प्रकारचे ऐतिहासिक प्रदर्शन परळीत होत असून ही परळीकरांसाठी अभिमानाची बाब आहे. या महा एक्स्पोचा मोठ्या संख्येने लाभ घ्यावा असे आवाहन नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांनी केले आहे.



# स्वा. रा. ती. रुग्णालयातील बाह्यरुग्ण चिठ्ठी विभागात गोंधळ; सुट्ट्या पैशांच्या नावाखाली रुग्ण नातेवाईकांची आर्थिक पिळवणूक?

■ अंबाजोगाई (प्रतिनिधी):

स्वामी रामानंद तीर्थ (स्वा. रा. ती.) ग्रामीण रुग्णालय, अंबाजोगाई येथील बाह्यरुग्ण (ओपीडी) चिठ्ठी विभागात सुट्ट्या पैशांच्या कारणावरून रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. वीस रुपयांची ओपीडी चिठ्ठी काढण्यासाठी रुग्ण नातेवाईकांनी शंभर किंवा पन्नास रुपयांची नोट दिल्यास संबंधित कर्मचारी सुट्टे पैसे देण्यास नकार देत असल्याची तक्रार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, "सुट्टे नाहीत, नंतर या" असे सांगून रुग्णांना परत पाठवले जाते. मात्र तपासणी पूर्ण होईपर्यंत संबंधित कर्मचारी ड्युटी संपवून निघून जातात. परिणामी, रुग्ण नातेवाईकांना दिलेल्या रकमेचे उर्वरित पैसे मिळत नाहीत. अनेक वेळा रुग्णांची तपासणी, औषधोपचार व इतर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत चिठ्ठी विभागातील कर्मचारी उपलब्ध नसल्याने रुग्णांना आर्थिक तोटा सहन करावा लागत असल्याचा आरोप आहे.




गरीब, शेतकरी व ग्रामीण भागातून येणाऱ्या रुग्णांसाठी वीस-तीस रुपयेही महत्त्वाचे असतात. अशा परिस्थितीत सुट्ट्या पैशांच्या कारणावरून होणारी ही अडवणूक म्हणजे आर्थिक पिळवणूकच असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. रुग्णालय प्रशासनाने या प्रकाराची तात्काळ दखल घेऊन संबंधित विभागात पारदर्शक व्यवस्था निर्माण करावी, सुट्ट्या पैशांची स्वतंत्र सोय करावी किंवा डिजिटल पेमेंटची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी होत आहे. शासकीय रुग्णालय हे सर्वसामान्यांचे आधारस्थान असताना अशा प्रकारांमुळे रुग्णांचा विश्वास डळमळीत होत असल्याची खंत व्यक्त केली जात आहे. रुग्ण नातेवाईकांची आर्थिक पिळवणूक तात्काळ थांबवून जबाबदार अधिकाऱ्यांनी योग्य ती उपाययोजना करावी, अशी सर्वसामान्यांची अपेक्षा आहे.

# एसआरटी परिसरातील बीओआयचे एटीएम कायम बंद; रुग्ण व नातेवाईकांना मोठा मनस्ताप, मशीन तात्काळ सुरू करण्याची नागरिकांची मागणी

■ अंबाजोगाई (प्रतिनिधी)

स्वामी रामानंद तीर्थ (एसआरटी) रुग्णालय परिसरातील बँक ऑफ इंडिया (बीओआय)चे एटीएम मशीन गेल्या काही दिवसांपासून सतत बंद अवस्थेत असल्याने रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या सामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

रुग्णालयात दाखल असलेल्या पेशंटच्या नातेवाईकांना औषधे, तपासण्या व इतर तातडीच्या खर्चासाठी रोख रकमेची आवश्यकता असते. मात्र एटीएम बंद असल्यामुळे त्यांना शहरात इतरत्र जाऊन पैसे काढावे लागत असून वेळ व पैशांचा अतिरिक्त खर्च सहन करावा लागत आहे. विशेषतः ग्रामीण भागातून येणाऱ्या नागरिकांना याचा अधिक फटका बसत आहे. अनेक वेळा आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ रोख रक्कम आवश्यक असताना एटीएम बंद असल्याने नातेवाईकांची धावपळ होत आहे. त्यामुळे रुग्णसेवेवरही अप्रत्यक्ष परिणाम होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या पार्श्वभूमीवर बीओआय बँक प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन एटीएम मशीन नियमित सुरू ठेवावे व योग्य देखभाल करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

